नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७ Issue - 27 | वार शुक्रवार दि. १३ जून २०२५ Blow- Friday Date 13 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



# अहमदाबादमध्ये विमान कोसळले; २४१ प्रवाशांचा जागीच मृत्यू

## संपूर्ण देश शोकसागरात; मृतांची ओळख पटविण्यासाठी डीएनएचे नमुने घेतले जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहमदाबाद : गुजरातमधील अहमदाबाद विमान दुर्घटनेचा व्हिडिओ समोर आला अन् अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. २४२ प्रवाशांसह अहम दाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळा-वरुन लंडनसाठी उड्डाण घेतलेलं विमान अवघ्या ७ मिनिटांत खाली कोसळलं. विमान दुर्घटनेचे वृत्त समोर येताच विमानातील प्रवाशांसाठी प्रार्थना होऊ लागल्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशास-नाने व बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीला सुरुवात केली. मात्र, दुर्घटनेचा व्हिडिओ पाहून मनात जी शंका न राहून होती होती, अखेर तेच घडलं. एअर इंडियाच्या Boeing Dreamliner ७८७ विमाना-तील सर्वच्या सर्व २४२ प्रवाशांचा या दुर्घटनेत मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. एपी न्यूजने यासंदर्भातील वृत्त दिले असून गुजरामधील पोलीस आयुक्तांशी संवाद साधल्यानंतर ही माहिती समोर आली आहे. गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या विमान दुर्घटनेत विमानातील सर्वच्या सर्व २४२ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त असोसिएट प्रेस वृत्तसंस्थेने दिलं आहे. महत्त्वाचं म्हणजे या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे सुद्धा प्रवास करत होते. एअर इंडियाचेहे विमान अहमदाबादवरुन लंडनकडे निघालं होतं. दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी विमानानं लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर अवघ्या ७ मिनिटात हे विमान कोसळलं. विमानाने हवेत टेक ऑफ केल्यानंतर जवळच असलेल्या मेघ-ानी नगर या दाट लोकवस्तीच्या भागात जाऊन हे विमान कोसळले. या विमानात १२ क्रू मेंबर्स आणि २३० प्रवासी प्रवास करत होते. क्रू मेंबर्समध्ये मुंबईकर अपर्णा महाडिक या सुद्धा होत्या. अपर्णा महाडिक या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरेंचे भाचे अम ेल यांच्या पत्नी होत्या. एअर इंडियाच्या दुर्घटनाग्रस्त विमानातील एकूण २४२ प्रवाशांमध्ये, १६९ भारतीय प्रवासी, ५३ ब्रिटीश नागरिक, पोर्तुगालचे ७ आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत हो-ते, अशी माहिती समोर आली आहे. दुर्दैवाने सर्वच प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून दुर्घटनेनंतर विमानातील प्रवाशांच्या नातेवाईकांनी घटनास्थळावर धाव घेतली. जवळील रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळत आहे. या दुर्घटनेनं अवघा देश शोकसागरात बुडाला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करुन शोक व्यक्त केला. तर, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी देखील शोक व्यक्त केला आहे.

**हॉस्पिटलमधील १५ डॉक्टर जखमी**

विशेष म्हणजे विमानाचा अपघात इतका भयंकर होता की, अहमदाबादच्या बी.जे. मेडिकल कॉलेजच्या इमारतीवर हे विमान कोसळलं असून तेथील हॉस्टेलवर जेवण करणाऱ्या भावी डॉक्टरांना भरल्या ताटावरुन उठवण्याचं काम ह्या दुर्घटनेनं केलं. या दुर्घटनेचे काही फोटो समोर आले असून पोटात कालवणारी, अत्यंत हृदयद्रावक ही घटना आहे. या दुर्घटनेत येथील १५ डॉक्टर जखमी झाल्याची माहिती आहे.

२४२ प्रवाशांसह लंडनसाठी उड्डाण घेतलेलं हे विमान अचानक खाली कोसळलं अन् मोठा स्फोट झाला. या स्फोटात विमानातील सर्वच्या सर्व २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे गुजरातचे माजी मुख्यमंत्री आणि वरिष्ठ भाजप नेते विजय रुपाणी हेही प्रवास करत होते. आता, या दुर्घटनेत विजय रुप-ाणी यांचा देखील मृत्यू झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनात शिंदे यांनी दिली. ऋम



ाजी मुख्यमंत्री विजय रुपाणी या विमान प्रवासात होते, त्यांचाही मृत्यू झाला आहे. मी दुर्घटनेबाबत ऋखेद व्यक्त करतो, असे एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

दरम्यान, या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोद-ींसह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह दिग्गजांनी शोक व्यक्त केला आहे. एअर इंडियाचं हे अपघातग्रस्त विमान बोईंग कंपनीचे असल्याने आता बोईंग कंपनीतील तज्ज्ञांची टीम भारतात पाठवण्यात येणार आहे. एअर इंडिया दुर्घटनेसंदर्भात तपासासाठी बोईंगकडून टीम येणार असल्याची माहिती टाटाकडून देण्यात आली.

टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी बोईंगच्या सीईओंसोबत चर्चा केली. दुर्घटनेचे नेमकं कारण काय आहे? याच्या तपासासाठी जीई एरोस्पेस देखील तपासात मदत करण्यासाठी टीम पाठवणार असल्याची माहिती आहे.

### टाटा ग्रुपकडून मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटींची मदत

मुंबई : अहमदाबाद विमान दुर्घटनेत एअर इंडियाच्या (ळी ळपवळर) बोईंग १७१ फ्लाईटमधील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून सुदैवाने १ प्रवासी बचावला आहे. अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी घटनेनं देश शोकसागरात बुडाला असून २४१ प्रवाशांच्या कुटुंबीयांवर आणि नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. एअर इंडिया ही कंपनी टाटा ग्रुपने (ढरींr) घेतल्याने या विमान दुर्घटनेनंतर टाटा ग्रुपकडूनही दुःख व्यक्त करण्यात आलं आहे. अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत आणि सामाजिक जाणीव ठेऊन टाटा ग्रुपने विमान दुर्घटनेतील (रहाशवरलरव श्रिरपश लीरिह) जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्च देखील टाटा ग्रुपकडूनच करण्यात येणार असून आवश्यक ती सर्व काळजी आणि मदत जखमींना मिळेल, असे टाटा ग्रुपने म्हटले आहे. तर, विमान अपघातात कोसळलेल्या अहमदाबादमधील बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या बांधकामात मदत करण्याचे आश्वासनही टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांच्याकडून देण्यात आले आहे. टाटा ग्रुपचे चेअरमन एन. चंद्रशेखर यांनी पत्रक जारी करत विमान दुर्घटनेवर शोक व्यक्त केलं. ''एअर इंडिया फ्लाइट १७१ मधील दुःखद घटनेने आम्हाला खूप दुःख झाले आहे. या क्षणाच्या आमच्या दुःखद भावना शब्दात व्यक्त न करता येणाऱ्या आहेत. विमान दुर्घटनेत ज्या कुटुंबीयांनी आपले प्रियजन गमावले आहेत, आणि जे जखमी झाले आहेत त्यांच्यासोबत आमच्या सहवेदान आणि प्रार्थना आहेत. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला (वारसांना) टाटा ग्रुपकडून १ कोटी रुपयांची मदत करण्यात येईल. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्चही आणि त्यांना आवश्यक ती सर्वो तोपरी मदत करण्याचे आश्वासन टाटा ग्रुपकडून देण्यात आले आहे. तसेच, विमान दुर्घटनेमुळे इमारत कोसळलेल्या बी.जे. मेडिकलच्या वसतिगृहाची नव्यानी उभारणी करण्यातही टाटा ग्रुप पुढाकार घेईन,'' असे टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांनी जाहीर केले.

**बचावलेल्या प्रवाशाला भेटलो : अमित शाह**

# विमानात सव्वा लाख लिटर इंधन होतं... कुणालाच वाचवण्याची संधी मिळाली नाही : अमित शाह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहमदाबाद : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यांनी या घटनेनं संपूर्ण देश स्तब्ध आहे, असं म्हटलं. संपूर्ण देश एकसाथ आणि संवेदनांसह दुर्भाग्यपूर्ण दुर्घटनेत ज्या प्रवाशांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांसोबत आहे. अमित शाह म्हणाले की, भारत सरकार, गुजरात सरकार, भारताचे पंतप्रधान यांच्यावतीनं ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो.

अमित शाह म्हणाले, अपघातानंतर १० मिनिटात भारत सरकारला माहिती मि ळाली. तातडीनं मी मुख्यमंत्री, गृहमंत्री, गृहविभागाचे नियंत्रण कक्ष, नागरी उड्डयण मंत्री, ना-गरी उड्डयण विभाग सर्वांसोबत चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन लगेच आला होता, असं अमित शाह यांनी सांगितलं. भारत सरकार, गुजरात सरकार आणि सर्व विभाग मदत कार्य आणि बचाव कार्य करत आहेत. या विमानात २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर होते. यापैकी एक प्रव-ाशी वाचल्याची माहिती समोर आली आहे. त्याला भेटून आलो आहे. मृत्यूंची संख्या डीएनए परिक्षण आणि प्रवाशांची ओळख पटवल्यानंतर प्रशासन अधिकृत पणे जाहीर करेल, अशी माहिती देखील अमित शाह यांनी दिली. घटनेनंतर तातडीनं गुजरात सरकारनं आपत्ती व्यवस्थापनांच्या सर्व विभागांना अलर्ट केलं. आरोग्य विभाग, फायर ब्रिगेड, पोलीस विभाग असो भारत सरकारच्या सीएपीएफला संपर्क करुन सर्वांनी एकत्र मिळून मदत कार्य आणि बचाव कार्य केलं. सव्वा लाख लिटर इंधन विमानात होतं. तापमान इतकं वाढलं की कुणालाही वाचवण्याची संधी मिळाली नाही. मी घटनास्थळावर जाऊन आलो आहे, असंही अमित शाह यांनी सांगितलं. सर्व प्रवाशांच्या मृतदेहाला बाहेर काढण्याचं काम जवळपास पूर्ण झालं आहे. ज्या प्रवाशांचे नातेवाईक इथं पोहोचले आहेत त्यांचे डीएनए घेण्याचं काम दोन तीन तासात पूर्ण होईल. विदेशात ज्यांचे नातेवाईक आहेत त्यांना माहिती देण्याचं काम झालं आहे. ते जेव्हा पोहोचतील तेव्हा डीएनए घेतले जातील, असं अमित शाह म्हणाले. जितके मृतदेह मि ळाले आहेत, त्यांचे डीएनए नमुने घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. गुजरातमध्ये १००० डीएनए टेस्ट कराव्या लागतील. याची सुविधा गुजरातमध्ये आहे. त्यासाठी दुसऱ्या राज्यात जावं लागणार नाही. एफएसएल आणि नॅशनल फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठ दोन्ही संस्था कमी वेळात डीएनए परिक्षण पूर्ण करतील. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांना दिले जातील. नातेवाईकांची राहण्याची व्यवस्था इतर व्यवस्था योग्यपणे करण्यात आली आहे. आढावा बैठकीत याबाबत माहिती घेण्यात आली आहे, अशी माहिती अमित शाह यांनी दिली. नागरी उड्डयण विभागानं चौकशी सुरु केली आहे. या विभागाच्या मंत्र्यांनी योग्यप्रकारे चौकशी व्हावी, अशा सूचना केल्या आहेत, असं अमित शाह म्हणाले. हा अपघात आहे, अपघाताल कोणी रोखू शकत नाही. परंतु ३६५ दिवस २४ तास अशा प्रकारच्या घटनांवेळी प्रशासनाच्या तत्परतेची कसोटी होते. गुजरातच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या तत्परतेची कसोटी दुर्भाग्यपूर्ण स्थितीत झाली ते सर्वांसमोर आलं, असं अमित शाह म्हणाले.

### विमान दुर्घटनेत एक जण जिवंत

अहमदाबाद : गुजरातच्या अमहमदाबाद येथे विमान अपघ-ाताची मोठी दुर्घटना घडली आहे. या अपघातानंतर विमाना-चा अक्षरशः चुराळा झाला. विमानाचे अवशेष अस्थाव्यस्थ पडलेले बघायला मिळाले. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला. त्यामुळे या अपघातात अनेक जण दगावल्याची भीती वर्तवली जात आहे. घटनास्थळावरचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हे व्हिडीओ सुन्न करणारे आ-हेत. अपघातग्रस्तांच्या बचावासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. एनडीआरएफचं पथक, अग्निशामक दल, पोलीस यांच्याकडून बचावकार्य सुरु आहे. या बचावकार्यादरम्यान एक चमत्कार बघायला मिळाला आहे. या अपघातात एक प्रवासी सुखरुप बचावल्याची माहिती आहे. रमेश विश्वकुमार असं या प्रवाशाचं नाव आहे.

रमेश विश्वकुमार यांनी मीडियाला महत्त्वाची माहिती दिली आहे. आधी स्फोट झाला नंतर विमान कोसळलं, अशी माहिती त्यांनी दिली. रमेश विश्वकुमार यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ते अपघातस्थळाहून रुग्णवाहिकेने पायी जाताना दिसत आहेत. सोशल मीडियावर अनेकांकडून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.



## संपादकीय....

### अनपेक्षित घटना

गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातानं देश हादरला आहे. अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन लंडनला निघालेल्या विमानाला उड्डाणानंतर अवघ्या ६ मिनिटांत अपघात झाला. या विमानात २४१ जणांचा जागीच मृत्यू झाला. पैकी १२ क्रू मेम्बर्स होते. कारण टेक ऑफ केलेल्या विमानात मोठा इंधन साठा असतो. एअर इंडिया बोईंग ७८७ ड्रिमलायनर आकारानं मोठं विमान आहे. अपघातग्रस्त विमान ११ वर्षे जुनं आहे. गुरुवारी दीड वाजता विमानानं उड्डाणे केलं. सॅटेलाईज इमेजनुसार १ वाजून ३८ मिनिटांनी विमान धावपट्टीच्या शेवटच्या भागात होतं. टेक ऑफनंतरच्या काही मिनिटांत समुद्र सपाटीपासून ६२५ फुटांवर होतं. यानंतर विमानाशी असलेला संपर्क तुटला. विमानतळ समुद्र सपाटीपासून २०० फूट उंचीवर आहे. याचा अर्थ विमान विमानतळापासून ४०० फूट उंचावर होतं. टेक ऑफनंतर विमानाची सिग्नल यंत्रणा ऍक्टिव्ह होती. १ वाजून ४० मिनिटांनी विमान कोसळलं. ४०० फूट प्रति मिनिट वेगानं विमान खाली कोसळत होतं. त्यामुळे पायलटकडे काहीही करण्यासाठी अवघा एक मिनिट होता. इतक्या कमी कालावधीत विमानाचा अपघात टाळण्याची शक्यता अतिशय कमी होती. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, विमान समुद्र सपाटीपासून ६२५ फूट उंचीवर होतं. विमान ३५ हजार फूट उंचीवर असतं, तर क्रू मेम्बर्सना स्थिती सांभाळण्यासाठी अधिक वेळ मिळाला असता. त्यामुळे अनेकांचे जीव वाचले असते. पण अपघात टेक ऑफनंतर अवघ्या काही मिनिटांत झाल्यानं ते कमी उंचीवर होतं. त्यामुळे पायलटकडे दुर्घटना टाळण्यासाठी अत्यंत कमी वेळ होता.

# डॉ.धम्मपाल साबळे यांनी १३ वर्षीय चिमुकल्या मुलीच्या पोटातून ४ किलोचा गोळा काढून दिले जिवदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : साधारण पंधरा दिवसांपूर्वी एक, तेरा वर्षाची गोड मुलगी तिच्या आईसोबत ओपीडी ला आली. काय त्रास होत आहे तुम्हाला, मी त्या मुलीच्या आईला विचारले. त्यावर त्या म्हणाल्या पेशंट मी नाही, माझी मुलगी आहे. तिची आई म्हणाली, बघा ना डॉक्टर साहेब माझ्या मुलीचे पोट फुगल्या सारखे वाटत आहे. पोटात एखादी मोठी गाठ आल्यासारखे वाटत आहे. मी त्यांना विचारले किती दिवसांपासून आहे? तर त्या म्हणाल्या माहिती नाही कधी पासून आहे , पण आमच्या लक्षात कालच आले. तसा त्याचा काहीच त्रास नाही तिला. दुखणे पण नाही. तिला इतर काही त्रास नव्हता. मी आमच्या सिस्टरांना आवाज दिला व त्या गोड मुलीला तपासणी करण्यासाठी घेतले. तपासून बघितले तर त्या कोवळ्या मुलीच्या पोटात एक भली मोठी गाठ होती. ती गाठ एवढी मोठी होती की त्या छोट्याशा मुलीचे पूर्ण पोट त्या गाठीने व्यापून घेतलेले होते.

तिच्या आई ला सांगितले की, ताई, पोटामध्ये गाठ तर खूपच मोठी आहे. आपल्याला योग्य त्या तपासण्या जसे की सोनोग्राफी, सिटी स्कॅन व रक्ताच्या काही तपासण्या करणे आवश्यक आहे. लवकरात लवकर तपासणी झाली की निदान लवकर होईल व आपल्याला लवकर उपचार सुरू करता येतील. त्यांना सर्व तपासण्या करण्यास सांगीतले.

असेच मध्ये दोन दिवस गेले. तिचे आईवडील त्या सर्व तपासण्या चे रिपोर्ट्स घेऊन आले. रिपोर्ट्स वाचून आम्हाला जरा टेंशन आले. कारण पोटातला गोळा बराच मोठा होता. खरं सांगायचं तर त्याचा आकार एका मोठ्या कलिंगडा ( २० cm X १६ cm ) एवढा होता. व त्यामुळे पोटातील आतडी व इतर अवयव बाजूला लोटल्या गेले होते. त्याचे मूळ हे उजव्या अंडाशया पासून होते हे पण एक चिंतेची बाब होती. आणि सर्वात चिंतेची गोष्ट म्हणजे ती गाठ कर्करोगाची पण असू शकते असे रिपोर्ट्स मध्ये नमूद होते.



एका क्षणात त्या हसऱ्या मुलीचा चेहरा डोळ्यासमोर आला. छोटीशी ती मुलगी आणि किती कष्ट तिच्या वाट्याला. तिच्या आईवडिलांना रिपोर्ट्स बद्दल ऐकून गहिवरून आले. त्यांना शांत केले. सर्व परिस्थिती ची कल्पना व गांभीर्य समजावून सांगितले.

यावर उपचार तर ऑपरेशनच. त्यांना समजावून सांगितले की जितक्या ताबडतोब आपण ऑपरेशन करू तितके मुलीसाठी चांगले. आपल्याकडे सहसा ऑपरेशन म्हटले की प्रश्न येतो खर्च किती? मी त्यांना म्हटलं खर्च येणारच पण आपण कमीतकमी खर्चात ऑपरेशन करूया. तुम्ही त्याचा विचार नका करू. आपण मुलीच्या तब्येतीचा विचार प्रथम करू.

मुलीच्या आईवडिलांनी आम्हाला थोडा वेळ मागितला. कारण त्यांच्या साठी हा एक मोठा धक्का होता. त्यांना आपल्या गोड मुलीचे ऑपरेशन करावे लागेल या विचाराने गहिवरून आले. पण मुलीच्या भविष्याचा विचार करून ते दोघेपण ऑपरेशन करण्यास तयार झाले.

सर्व त्या तपासण्या करून, भूलतज्ज्ञ कडून हिरवी झेंडी मिळाल्यावर आम्ही ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. मी स्वतः (सर्जन), डॉ. निवेदिता साबळे



( भूलतज्ज्ञ), डॉ गोठवाल (कॅन्सर ऑपरेशन तज्ज्ञ) आणि आमचा स्टाफ या सर्वांच्या प्रयत्नाने ऑपरेशन अगदी व्यवस्थित पार पाडले. यशस्वीरित्या तिच्या पोटातील तो मोठा गोळा ऑपरेशन करून बाहेर काढला. दोन्ही बाजूच्या अवधान्याच्या गाठी काढून तपासणी साठी पाठवल्या. जवळपास पावणेचार किलोचा होता तो गोळा.

ऑपरेशन नंतर जवळपास चार दिवस ती दवाखान्यात भरती होती. सर्व सुरळीत झाले. एकदम ठणठणीत झाली आणि आम्ही तिला सुट्टी दिली. आमच्या प्रयत्नांची तर गोष्ट होतीच, पण गोष्ट तिच्या हिंमतीची आणि सहनशीलतेची पण होती. हॉस्पिटल मधून सुट्टी करतांना तिच्यासोबत एक छान फोटो काढला आणि त्या मुलीला आम्ही नाव दिले गोजिरी. तिच्या आईवडिलांनी आमचे मनापासून आभार मानले व तिला आनंदाने घरी घेऊन जात होते.

एक वेगळेच आत्मसुख मिळाले.



खरंच आता तिच्या आईवडिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. तो आनंद आम्ही त्यांना देऊ शकलो याचे आम्हाला खूप समाधान वाटले.

**– डॉ. डी. पी. साबळे**

MBBS, DNB, FIGES, FMS, FISCP

जनरल व लेप्रोस्कोपिक सर्जन,

पोटविकार व लेझर मूळव्याध तज्ज्ञ

**– डॉ. निवेदिता डी. साबळे**

MBBS, DNB (भूलतज्ज्ञ व आय. सी. यु. तज्ज्ञ)


साबळे हॉस्पिटल चिखली, जिल्हा – बुलढाणा

# मुन्नाभाई नंदागवळी यांची आंबेडकरवादी कविता म्हणजे वास्तवाचा जीवंत दस्ताऐवज....!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी यांची कविता समकालीन सामाजिक–राजकीय वास्तवाचा जिवंत दस्ताऐवज आहे. आजुबाजूला घडत असलेल्या घटनांचे अत्यंत जाणिवपूर्वक वाचन करीत ही कविता जीवनाचे नेमके अन्वर्थन मांडते. विचारसंघर्ष हा या कवितेचा स्थायीभाव आहे. भारतीय समाजाने चौफेर नुकसान करणाऱ्या 'आहे रे' वर्गाचे विकृत मानसशास्त्र चितारून 'नाही रे' वर्गाच्या वाट्याला आलेल्या हलाखीच्या परिस्थितीचे विदारक वर्णन ही कविता करते. परंतु नुसते वर्णन करणे हा या कवितेचा स्वभाव नसून प्रश्न जन्माला घालणाऱ्या व्यवस्थेसमोर उत्तरांचा मातृकोष सादर करणे हे या कवितेचे जन्म प्रयोजन आहे.

मुन्नाभाई नंदागवळी हे आंबेडकरवादी कवी आहेत. ही कविता भूमिका घेणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची आणि संवेदनशील व्यक्तीची कविता आहे. या कवीला विचारातील भेसळ कुठल्याही परिस्थितीत मंजुर नाही. संविधानाने परिघावर आणि परिघाबाहेरील माणसांना चेहरा दिला. देशाला शक्तिसौष्ठव बहाल केले संविधानाने! परंतु सर्वांगसुंदर संविधानालाच निकालात काढण्याचे प्रयत्न या देशात दिवसाढवळ्या सुरु आहेत. त्यामुळेच अशा जहरी मनोवृत्तीवर ही कविता कडाडून टिका करते. सद्याच्या राजकीय सत्तेचा खरपूस समाचार घेते. या कवितेला धम्माचे सुंदर अधिष्ठान लाभले असून मानवी दुःख जाणिवांशी तादात्म्य पावणारी ही सद्विवेकी कविता आहे.




'पळसफुलांचा धम्म सोहळा' या कवितेतून माणूस विद्रुप करणाऱ्या आणि वर्तमान बेचिराख करणाऱ्या सर्वच षडयंत्रांना नाकारले आहे. सर्वांना मायेने जवळ घेणारे, सर्वांचे हित जोपासणारे निळे गगन कवितेला अपेक्षित आहे. ही कविता सजग, डोळस आणि अंतर्मुख असणाऱ्या कवीची असून जीवनातील असमतोलाचे सर्व तळ उध्वस्त करणारी आणि माणूसकीचे अजिंक्य गीत गाणारी ही कविता आहे. माणसा–माणसात विभागणी करणाऱ्या आणि विषमतेवर अपरंपार प्रेम करणाऱ्या मानसिकतेला 'आम्ही आमच्या कवितेत थोतांड, बुवाबाजी, यज्ञ, पारायण मांडत नाही' असे ठणकावून सांगणाऱ्या कविची ही कविता आहे. या कवितासंग्रहातून प्रगट होणारे विभिन्न प्रकारचे संदर्भ हे उजेडाचे साक्षांकन करणारे आणि जगण्याला विवक्षित दृष्टी प्रदान करणारे आहेत.



**– प्रा. डॉ. अनमोल शेंडे,**

गोविंदराव वारजूकर, कला वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपूर.

समीक्षा :

काव्यसंग्रह – पळसफुलांचा धम्मसोहळा

कवी – मुन्नाभाई नंदागवळी

प्रकाशन – ठसा प्रकाशन गृह, नाशिक

किंमत – १५० रुपये



# विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती अभियानात सहभागी व्हावे : आनंद अवधानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पुस्तक वाचनामुळे मेंदू बळकट होतो, अंतरिक मनाला ऊर्जा मिळते ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. समाजात देखील नावलौकिक मिळतो. म्हणून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती अभियानात सहभागी व्हावे, असे प्रतिपादन आनंद अवधानी पुणे यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय व सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृती अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्रिसिजन चे जनसंपर्क अधिकारी माधवराव देशपांडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात वांग्मय मंडळ आयोजित वाचन संस्कृती अभियान कार्यक्रम**

पुढे ते म्हणाले की, वाचन संस्कृती रुजविण्यामध्ये सोलापूर शहरात प्रिसिजन ने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांनी देखील त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे वाचन संस्कृती चळवळीला गती मिळाली आहे. अक्कलकोट परिसरातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन ही चळवळ आणखीन गतिमान करावी.

**वाचन संस्कृती अभियान कार्यान्वित करणार**

**विद्यार्थ्यांची अंतरिक प्रेरक शक्ती जागृत करण्यासाठी आम्ही संस्थेच्या वतीने शिक्षकांच्या मदतीने वाचन संस्कृती अभियान उपक्रम कार्यान्वित करणार आहोत असे यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती यांनी सांगितले.**

माधवराव देशपांडे म्हणाले की, पुस्तक विद्यार्थ्यांचे मित्र असतात पुस्तक वाचनामुळे विद्यार्थ्याच्या विचाराला गती मिळते. तो आपल्या मनातील भावना प्रगट करू शकतो. म्हणून वाचन संस्कृती अभियान राबविले जात आहे.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे यांनी केले, आभार पर्यवेक्षक रुगे यांनी मानले.

**महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या सुश्राव्य किर्तनाला जमली अलोट गर्दी**

# श्री समर्थ कृपा भजन मंडळाचा १५ वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : आध्यात्मिक ओढीने,वारकरी सांप्रदायिक भक्तीने प्रतिवर्षी भव्य – दिव्य रेल्वे प्रवासी भजन स्पर्धा व किर्तन सोहळा संयोजित करणाऱ्या श्री समर्थ कृपा भजन मंडळाचा १५ वा वर्धापनदिन सोहळा नुकताच रविवार दि.०८ जून २०२५ रोजी मोरेश्वर विद्यालय,नालासोपारा ( पूर्व ) येथे पार पडला.भव्य – दिव्य किर्तन सोहळ्याला प्रथमच वसई/नालासोपारा/विरार शहरात प्रथमच महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध किर्तनकार,समाजप्रबोधनकार महाराष्ट्र भूषण ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख ( इंदोरीकर महाराज ) यांना पाचरण केल्याने परिसरात लोकांची अलोट गर्दी उसळली होती.सदर सोहळा श्री संत सेवा भजन सामाजिक संस्था ( रजि.) महासंघ व श्री संत ज्ञानेश्वर माऊली रे.प्र.भ.सामाजिक संस्था ( रजि.) आदी संस्थेच्या संलग्नतेने पार पडला.पश्चिम,हार्बर आणि मध्य अशा तीनही लाईन मधील एकूण १९ रेल्वे प्रवासी भजन मंडळे या स्पर्धेत सहभागी झाली होती.सदर स्पर्धेचे परीक्षण संगीत अलंकार – ह.भ.प. नारायण महाराज खिल्लारी, मृदुंगम हामेरू – ह.भ.प.चंदू नाना महाराज पांचाळ माऊली ( आळंदी ) वादक ह.भ.प.राहुल जाधव माऊली मुंबई यांनी अतिशय उत्तम रित्या केले.श्री समर्थ कृपा भजन मंडळातर्फे घेण्यात आलेल्या






भव्य–दिव्य रेल्वे प्रवासी भजन स्पर्धेतील मानकरी सांघिक प्रथम तीन भजन मंडळास मृदुंग देऊन गौरविण्यात आले.स्पर्धेत सांघिक प्रथम क्रमांक – ओम गुरूदेव रेल्वे प्रवासी भजन मंडळ– अंकुश सावंत,द्वितीय – ब्राम्हानंद भजन मंडळ– विठ्ठल मयेकर,तृतीय – साई सेवा भजन मंडळ – शरद तटकरे,सांघिक द्वितीय – पांडुरंग कृपा भजन मंडळ – राम उत्तेकर सांघिक तृतीय – ओमकार भजन मंडळ – विजय शिगवण,दर्शनिय लक्षवेधी – श्री साई गणेश भजन मंडळ,उत्कृष्ट गायक– वारकरी भजन मंडळ – शंकर पाटील,उत्कृष्ट डफली–हेरंब भजन मंडळ – केदार हुमने,उत्कृष्ट रिदम –छत्रपती शिवराय भजन मंडळ –रोहीत साबळे,उत्कृष्ट चकवा – आवड हरिनामाची भजन मंडळ – श्रीकांत दयाळकर,उत्कृष्ट कोरस – ओम साईराज भजन मंडळ – योगेश नाचरे आदी भजन मंडळ,गायक यांनी क्रमांक प्राप्त केले.शिवाय सामाजिक कार्यातील व्यक्तींचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.ज्यामध्ये दिपक कारकर ( उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार– २०२५), विनोद चव्हाण – ( उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार – २०२५ ), संदीप कासरुंग – ( सामाजिक प्रेरणा पुरस्कार – २०२५ ), विठ्ठल



मयेकर –, ( सामाजिक प्रेरणा पुरस्कार – २०२५ ), गणेश तिटेकर ( उत्कृष्ट चकवा वादक पुरस्कार – २०२५ ) तर गेली २५ वर्षे रेल्वे प्रवासात भजन सेवा करणाऱ्या ओम गुरुदेव रेल्वे प्रवासी भजन मंडळ व श्रद्धा सबुरी भजन मंडळ यांना देखील विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.स्पर्धेला महाराष्ट्र उपमुख्यमंत्री याचे मुख्य शिलेदार विश्वासु – कोयनासुपुत्र – शशिकांत जाधव सह वसई – विरार – नालासोपारा विधानसभा क्षेत्रातील आजी–माजी आमदार,महापौर,सभापती, नगरसेवक,किर्तनकार,भजनप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. ह्या दैदीप्यमान सोहळ्याचे सर्वच स्तरावरून अभिनंदनासह कौतुक होत आहे.ह्या किर्तन सोहळ्यास किर्तन साथ श्री संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय भजन मंडळ नालासोपारा यांनी केली.कार्यक्रम नियोजनबद्ध करण्यासाठी श्री समर्थ कृपा भजन मंडळाचे अध्यक्ष – अरविंद मोरे माऊली,संस्थापक – ह.भ.प. विश्वनाथ बांद्रे माऊली कार्याध्यक्ष – प्रनव लांबाडे,खजिनदार – जनार्दन शिंदे बापु,सचिव – गजानन जोशी,उपाध्यक्ष – राजेश येले,संपर्क प्रमुख – सचिन धाडवे सहसचिव – अनिल बेकरे सहखजिंदार – राजु पाडावे, संदीप तावडे, सत्यवान केसरकर, संदीप जोशी, सिद्धेश यादव, सुनिल अंबावले, उमेश पंचमुख, महेंद्र मोरे, प्रमोद मोरे, स्वप्नील कारकर, गौरव सावंत आणि सर्व सभासद मंडळी यांनी अथक मेहनत घेतली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पोलीस हवालदार विष्णु केमदारणे यांच्या पत्नीने केले पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे व इतर दोन कर्मचारी यांच्यावर गंभीर आरोप

## या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी; विष्णू केमदारणे यांच्या पत्नीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/ प्रतिनिधी

इंदापूर पोलीस ठाण्यातील एक प्रामाणिक पोलीस हवालदार अचानक गायब झाला असून, त्याच्या गायब होण्यामागे थेट पोलीस निरीक्षक व त्यांचे सहकारी जबाबदार असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. हवालदार विष्णू केमदारने हे आपल्या प्रामाणिक कामासाठी ओळखले जात होते. मात्र, आता ते एक चिठ्ठी सोडून गायब झाले असून, त्या चिठ्ठीत त्यांनी तीन वरिष्ठ सहकाऱ्याकडून जीवाला धोका असल्याचा थेट उल्लेख केला आहे.




याप्रकरणात सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे विष्णू केमदारने यांच एक कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झालेल आहे. या रेकॉर्डिंगमध्ये पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे हे केमदारने यांना शिवीगाळ करत, गाढून टाकतो, लाथा घालतो अशा प्रकारच्या धमक्या देताना स्पष्ट ऐकू येत आहेत.

विष्णू केमदारने हे प्रतिबंधात्मक कारवाई विभागात कार्यरत होते. त्याच टेबलवर त्यांचे सहकारी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल सूर्यवंशी कार्यरत होते. मात्र, सूर्यवंशी हे रात्रभर पोलीस निरीक्षक कोकणे यांच्यासाठी वाळू तस्करांकडून हप्ते वसूल करण्याच्या 'खास कामात' गुंतलेले असल्यामुळे त्यांना थेट पोलीस स्टेशनच्या कामातून सूट दिली जात होती. परिणामी, संपूर्ण जबाबदारी केमदारने यांच्यावर येत होती.

प्रचंड कामामुळे त्रासलेल्या केमदारने यांनी एके दिवशी सरळ कोकणे यांना विचारले - सूर्यवंशी काम का करत नाही? - बस, एवढंच विचारल्यामुळे त्यांना धमक्यांना सामोरे जावं लागलं आणि शेवटी निराश होऊन ते घरातून निघून गेले.

त्यांच्या चिठ्ठीत लिहिलं आहे की, माझ काही बरं वाईट झालं तर सूर्यकांत कोकणे, रासकर आणि सूर्यवंशी जबाबदार असतील.

या पार्श्वभूमीवर हवालदार केमदारने यांच्या पत्नीने थेट पोलीस ठाण्यात येऊन सूर्यवंशी व निरीक्षक कोकणे यांच्यावर वाळू माफियांकडून पैसे वसूल करण्याचे गंभीर आरोप केले.

**प्रशासन गप्प का?**

या सर्व प्रकरणामुळे एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो - प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची सुरक्षा कुठे आहे?

जे अधिकारी माफियांशी संगनमत करून काम करत आहेत, त्यांच्यावर कारवाई होणार की त्यांना संरक्षण मिळणार?

ज्यांनी वर्दी घालून न्याय द्यायचा, तेच जर अन्याय करणारे ठरत असतील तर सामान्य जनतेचा पोलिसांवरचा विश्वास कसा टिकेल?

**विष्णू केमदारणे यांच्या पत्नींची मागणी काय आहे:**

या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

विष्णू केमदारने यांचा ठावठिकाणा शोधून त्यांना सुरक्षित परत आणावं.

वाळू माफियांशी संगनमत करणाऱ्या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करून गुन्हा दाखल करावा.



## पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन


सोलापूर : रोटरी क्लब ऑफ सोलापूर, इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ट्रस्ट आणि सोलापूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूरयांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी शुक्रवार दिनांक १३ जून २०२५ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने रो. सीए. सुनिल माहेश्वरी, अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ सोलापूर, रो. ब्रीजकुमार गोयदानी, सचिव, रो. आकाश बाहेती, प्रकल्प प्रमुख, रो. जयेश पटेल, डिस्ट्रीक गव्हर्नर, श्री. संग्राम पाटील, CSR मॅनेजर इक्विटास डेव्हलपमेंट, श्रीमती माधुरी मुसळे, CSR मॅनेजर इक्विटास डेव्हलपमेंट, श्री. वैभव उकर्डे, इक्विटास डेव्हलपमेंट, श्री. सचिन राठोड, इक्विटास डेव्हलपमेंट याच्या सहकार्याने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय. टी. आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर, बी. कॉम, एम. कॉम, अशा प्रकारची एकुण १४९२ पेक्षा जास्त रिक्तपदे २६ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिझ्यूमच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह शुक्रवारी दिनांक १३ जून २०२५ रोजी ठीक सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ड्रिम पॅलेस बैंक्वेट हॉल, सरस्वती चौक, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२१७-२९९२९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौकं, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर, श्रीमती संगीता खंदारे, यांनी केले आहे. अधिक माहितीस्तव https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट दयावी.





## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी परिवहन मंत्री श्री सरनाईक यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## विवाहाचा खर्च टाळून गो शाळेला गाजरे दाम्पत्याची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील बोकडदरे येथे असणाऱ्या भारत माता आश्रमाच्या गो शाळेला विवाहातील अतिरिक्त खर्चाला फाटा देत गाजरे दांपत्याने मदत देत गोमातेची वधूवरासह कुटुंबाने सेवा करत एक वेगळा आदर्श समाजत घालून दिला आहे.

डॉ.हेमंत अमृतराव गाजरे, विंचूर यांच्या मुलाच्या लग्न ता. ८/६/२५ चि.वैभव चि सौ का. शुभांगी जळगाव नेऊर येथील शिंदे कुटुंबाच्या मुलीसोबत झाला त्यांनी इतर खर्च टाळून राहिलेली रक्कम भारत माता आश्रम बोकडदरे येथील गो शाळेला आपल्या नववधूंच्या हाताने गोशाळेला चारा साठी गोशाळेचे संस्थापक जणेश्वरानंदगिरी महाराज व संचालक गोरक्ष समाधान कापसे आणि संतोष आरोटे यांच्याकडे सुपूर्त केली सहकुटुंब येऊन गोशाळेला भेट दिली व गुळ व डाळीचा प्रसाद करून सर्व गोमातेला दिले विंचूर गोशाळा मध्ये आता १०० गाई वासरे आहेत कत्तल पासून वाचवलेली सर्व गाई वासर येथे आहेत

यावेळी हेमंत गाजरे.. मनीषा गाजरे. वैभव गाजरे. शुभांगी गाजरे. सर्व गाजरे परिवार या प्रसंगी उपस्थित होते.

समाधान कापसे यांनी आभार मानले



## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र निफाड च्या वतीने लोणजाई डोंगरावर वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : निफाड तालुक्यातील लोणजाई माता मंदिर

परिसरातील डोंगरावर निफाड येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या महिला सेवेकऱ्यांनी वडाच्या झाडाची रोपे लावली असून

वटसावित्री पौर्णिमेनिमित्त महिलांनी लोंजाई डोंगरावरील वडाच्या झाडाची पूजा केली.विशेष म्हणजे ७ ते ८ वर्षांपूर्वी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रानेच या ठिकाणी वडाचे झाडे लावले होते



त्यातील बरीच झाडे आता मोठी झाली आहेत .त्याच झाडाची वटसावित्री पौर्णिमेनिमित्त पूजा केल्याने एक मानसिक समाधान आनंद मिळाल्याचे या महिलांनी सांगितले.

वटसावित्री पौर्णिमा साजरी करताना पर्यावरण संदेश आणि वसुंधरा पूजन असा संदेश या निमित्ताने दिला गेला आहे.

यावेळी वि.दा. व्यवहारे सुभाष खाटेकर, सूर्यभान टरले, प्रफुल्ल शिवदे, मधुकर सोनार, सोनाली व्यवहारे,वैशाली खाटेकर यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी दिले कबुतराला जीवदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : वटपौर्णिमेच्या निमित्ताने वडाच्या झाडाला बांधलेल्या धाग्यात एका कबुतराचा पाय अडकून तो हालहाल करत होता.ही दुर्दशा पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तिथे असलेल्या पुष्पा आवटे यांना सोबत घेऊन धागा सोडवला आणि त्या कबुतराला जीवदान दिले.





**वडाला बांधलेल्या धाग्यात अडकला होता कबुतराचा पाय**

दिलीप कोकाटे यांनी संयम, काळजी आणि माया दाखवत कबुतराला सुरक्षितरीत्या मुक्त केले. नागरिकांनी त्यांच्या या कृत्याचे कौतुक केले असून, धार्मिक कार्य करताना निसर्ग आणि प्राणिमात्रांची काळजी घेण्याचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

**शेकडो दिव्यांग बांधवांचा तहसीलसमोर सहभाग**

# निफाड तालुक्यात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचं अन्नत्याग आंदोलन सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : प्रहार जनशक्ती पक्षाचे व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष .बच्चू भाऊ कडू हे गेल्या काही दिवसांपासून अमरावती येथील मोझरीत अन्नत्याग आंदोलन करत आहेत. त्यांच्या या लढ्याला पाठिंबा दर्शवत निफाड तालुक्यातील प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने दोन दिवसांचे अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे.




दि.१२ व दि.१३ जून या दोन दिवस निफाड तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर हे आंदोलन सुरू असून, शेकडो दिव्यांग बांधवांनी आपल्या हक्कासाठी एकत्र येत आवाज बुलंद केला आहे. मोझरीसारख्या दूरच्या ठिकाणी सर्वच दिव्यांग बांधव जाऊ शकत नसल्यामुळे, निफाडमध्येच आंदोलन करून बच्चूभाऊंच्या लढ्याला हातभार लावण्याचा निर्धार संघटनेने केला आहे.

आजच्या आंदोलनात सोमनाथ धुमाळ, अनिल भावसार, बापू राऊत, नवनाथ घोटेकर, बाळू वाकचौरे, संजय विसपुते, ज्ञानेश्वर आढाव, विलास भालेराव, रामा गव्हाणे, बाळासाहेब दुसाने, गोरख उगले, ज्ञानेश्वर उगले, सुनील गोराडे, संजय सदाफळ, अंबादास तासकर, अंबादास गायकवाड, सागर धुमाळ, लक्ष्मण बैरागी, सूरदास पावशे, उषा सूर्यवंशी, संगीताताई राजगिरे, फकीरा सूर्यवंशी, प्रकाश वाघ, शितल पानपाटील, चित्रा वाघ, उज्वला कुशारे, सतीश कुमावत, कृष्णा कांबळे, जनाबाई चव्हाण, संजय कापसे, बाळासाहेब साळुंखे, रोशन तिडके, रोशन सानप, अविनाश पगार, रामदास शिंदे, अनिल खैरे, मुस्ताक पठाण, सोमनाथ वाघ, संदीप पवार यांच्यासह निफाड, लासलगाव, टाकळी विंचूर, विंचूर, साकोरे, उंबरखेड, पिंपळगाव बसवंत, पिंपरी, चांदोरी, देवगाव, कसबे सुकने, रानवड, नांदूरडी, कोकनगाव आदी गावांतील शेकडो दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## कृषी संकल्प अभियानास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहोळ : कृषि विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रातील सहा तालुक्यांमध्ये आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार व खरीप हंगामपूर्व नियोजनाच्या उद्देशाने, दि. २९ मे ते १२ जून २०२५ या कालावधीत 'विकसित कृषी संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. हे अभियान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर आणि राष्ट्रीय भरडधान्य संशोधन संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने राबविले जात आहे.या अभियानाच्या पंधराव्या दिवशी मोहोळ तालुक्यातील ढोकबाभुळगाव येथे आयोजन करण्यात आले.




सदर कार्यक्रमा दरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना डॉ. गणेश पवार (ऊस कृषी विद्यावेत्ता) यांनी ऊस लागवडीचे अर्थशास्त्र, बेणे प्रक्रिया व बेणे निवड, सरीतील अंतर, तण व्यवस्थापन, जमीनीचे आरोग्याचे व अंतर पिकाचे महत्त्व या बाबीच्या माध्यमातून सखोल असे मार्गदर्शन केले.

त्यानंतर डॉ. परशुराम पात्रोटी, वरिष्ठ शास्त्रज्ञ, केंद्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांनी भरड धान्याचे उत्पादनातून शाश्वत शेती व आरोग्याकडे वाटचाल करावी असे आवाहन केले. डॉ. शिल्पा परशुराम यांनी डाळिंब पिकातील तेल्या रोग व डाळिंबामध्ये येणारा मर रोग याबद्दल मार्गदर्शन केले. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे विषय विशेषज्ञ श्री. दिनेश क्षिरसागर यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना याविषयी सविस्तर माहिती दिली. पीक संरक्षण विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. पंकज मडावी यांनी खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन अशा विविध नवीन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. माती व पाणी परीक्षण आधारित खत व्यवस्थापन याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना मृद विज्ञान व कृषि रसायन शास्त्रं विषयाचे विषय विशेषज्ञ श्रीमती काजल जाधव म्हात्रे यांनी मार्गदर्शन दिली. मंडळ कृषी अधिकारी सुहास कौलगे यांनी कृषि विभागाच्या योजना याबद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली.

याप्रसंगी ढोकबाभुळगावचे सरपंच श्रीमती रुक्मिणी पांढरे ,उप कृषि अधिकारी सुनील चोपडे सहायक कृषि अधिकारी निखिल देशमुख, महिला आर्थिक विकास महामंडळ च्या श्रीमती आठवले मॅडम आणि चौधरी मॅडम कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बंडू मुळे, आठवले मॅडम श्री सुयोग ठाकरे आदींचे सहकार्य लाभले.

# आषाढी यात्रा कालावधीत मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ दर्शनाला प्राधान्य द्यावे

## पालकमंत्री जयकुमार गोरे; शासकीय महापुजेवेळी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मुखदर्शन राहणार सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै २०२५ रोजी असून, आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीने आवश्यक सुविधा पुरविण्याबरोबरच सुलभ व सुखकर दर्शन व्हावे, यासाठी आवश्यक नियोजन करावे. तसेच आषाढी एकादशीला विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा सूरू असतानाही .भाविकांना श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन व्हावे यासाठी आषाढी एकादशीच्या शासकीय महापुजा कालावधीत श्रींचे मुखदर्शन सुरू ठेवावे अशा सूचना पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केल्या.



आषाढी यात्रा पूर्व नियोजनाबाबत मंदिर समितीची श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होते. बैठकीस आमदार समाधान आवताडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे,प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, वास्तु विशारद श्रीमती तेजस्विनी आफळे, लेखाधिकारी मुकेश अनेचा, तसेच ऑनलाईनद्वारे मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासकीय महापूजेच्या वेळी मुखदर्शन व्यवस्था सुरू ठेवावी तसेच शासकीय महापूजा संपताच तात्काळ रांगेतील भाविकांची दर्शन व्यवस्था पूर्ववत करावी. शासकीय महापुजेवेळी मंदिरात गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन महापूजेला उपस्थितांची संख्या मर्यादित राहील याची दक्षता घेवून, शासकीय महापूजा विधीवत व परंपरेने पार पाडण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. भाविकांना जलद दर्शन व्हावे यासाठी व्हिआयपी दर्शन व्यवस्थेवर निर्बंध आणावेत. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम सुरू आहे त्या कामामुळे विद्युत वाहक केबल अस्ताव्यस्त झाल्या असून त्या केबल २४ जून पर्यंत पूर्ववत कराव्यात तसेच यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिरात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी सद्यस्थितीत सुरू असलेले काम थांबवून सदर ठिकाणची स्वच्छता करावी.

या कालावधीत नामदेव पायरी येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. गर्दीमुळे कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. दर्शन रांगेतील स्काय व तात्पुरते उड्डाण पूलांची पाहणी करून ते तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत का याची तपासणी करावी तसेच मंदिर व मंदिर परिसरातील इलेक्ट्रिक ऑडिट, फायर ऑडिट करण्यात यावे अशा सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, भाविकांना श्रींचे जलद दर्शन व्हावे तसेच दर्शन रांग जलद गतीने चालावी त्याचबरोबर घुसखोरी रोखण्यासाठी ज्यादा सुरक्षा रक्षकांची नियुक्ती मंदिर समितीकडून करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी समितीच्या वतीने विमा उतरविण्यात येणार आहे. दर्शन रांग, दर्शन मंडप, मंदिर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येणार असून, दर्शन रांगेतील भाविकांना मोफत चहा, नाष्टा जेवण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

तसेच मंदिर समितीकडून दर्शन रांगेत बॅरिकेटिंग, मॅट टाकणे, बसण्याची सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी, कुलर,स्वच्छता गृह , विश्रांती कक्ष लाईव्ह दर्शन व्यवस्था, सार्वजनिक सूचना प्रणाली आदी व्यवस्था उपलब्ध राहणार आहे.वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी १२६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत राहणार आहेत.तसेच तसेच चंद्रभागा वाळवंट येथे महिला भाविकांच्या सोयीसाठी चेंजिंग रूम व दर्शन रांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात येणार असल्याचे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

---

## थोडक्यात...




### दुचाकी कारचा अपघात; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) दुचाकी कारच्या अपघात प्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ६ जून रोजी रात्री घडली.याप्रकरणी शुभम नागेश देसाई (वय-२४,रा.भैय्या वस्ती,विणकर वसाहत जवळ, कर्णिक नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ऋतिक श्रीधर पुलगम (रा. विणकर वसाहत) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व त्याचे मित्र मनोजकुमार यांच्या दुचाकीवरून घराकडे येत असताना वरील ठिकाणी विरुद्ध दिशेने येणारी कार क्रमांक एम.एच.१३.ई.एच.४८४८ चे चालक ऋतिक पुलगम याने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजपणाने व भरधाव वेगाने चालवून फिर्यादी यांना धडक देऊन गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

---

# बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार एलएल.बी परीक्षा उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार यांनी वयाच्या ५० व्या वर्षी खडतर प्रयत्न करुन पहिल्याच टप्प्यात तीन वर्षात एल.एल. बी अभ्यासक्रम पूर्ण करून फर्स्ट क्लास ने मुंबई विद्यापीठातून परीक्षा उत्तीर्ण होऊन तरुण पिढी समोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

धिवार यांनी सामाजिक जीवनात कार्यरत असताना त्यांनी बहुजन हक्क परिषदेच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना न्याय मिळवून दिला. पोलीस स्टेशन असेल महसूल प्रशासन असेल या ठिकाणी सर्व सामान्य मनंसाच्या हाकेला धावणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची सर्व सामान्य जनमानंसात प्रतिमा आहे.

प्रस्थापित व्यवस्थेत अनेक गोर-गरीब लोकांना न्याय मिळत नाही. कित्येकांना वकील मिळत नाही. गोरगरीब लोकांना पोलीस स्टेशन तहसील,कोर्ट यामध्ये न्याय मिळवून देण्यासाठी अधिकृत वकील म्हणून कोर्टात जाता यावे व त्यांच्या अडीअडचणी सोडवता यावेत या एकाच उद्देशाने मी वकिल झालो अभ्यासक्रम पूर्ण केला. माझा मोठा मुलगा दुर्गेश हा सुद्धा वकील आहे. मी सुद्धा वकील व्हावं या उद्देशाने मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत असणारे सेंट विल्फ्रेड कॉलेज पनवेल येथे ऍडमिशन घेऊन ही पदवी प्राप्त केली. ही पदवी प्राप्त करताना खऱ्या अर्थाने माझ्या आईचा खूप मोठा वाटा आहे. कारण आईलाच असे वाटत होते की मी वकील व्हावे म्हणून परंतु माझ्या दुर्दैवाने आज माझी आई हयात नाही. ती जर जिवंत असती तर निश्चितच हा आनंदोत्सव जल्लोष साजरा केला असता. माझी ही वकील ची पदवी मी माझ्या आईचा चरणी अर्पण करतो अशी प्रतिक्रिया सुनिलतात्या धिवार यांनी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर आमच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली, यापुढे गोरगरीब जनतेचे सेवा करण्यासाठी मी या पदवीचा उपयोग करेल असे ही धिवार यांनी सांगितले. कौटुंबिक आणि सामाजिक चळवळीची जबाबदारी सांभाळत तरुण पिढी समोर वेगळा आदर्श निर्माण करुन, सुनिल तात्यांनी एल.एल. बी



परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होते एल एल बी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल बहुजन हक्क परिषद रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समिती, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समिती जेजुरी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले आहे.

---

# मुख्यमंत्री यांना आषाढीला आल्यानंतर गाढव भेट देणार : रणजित जकताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ संतोष मोरे

प्रहारचे संस्थापक बच्चु कडू यांनी शेतकरी कर्जमाफि,दिव्यांगांना महिना सहा हजार मानधन व इतर मागण्या साठि मोझरी येथे आठ जून पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. आंदोलनाला पाच दिवस झाले आहेत. बच्चु कडू यांची तब्बेत घालवली असून तीन ते चार किलो वजन कमी झाले आहे. शासनाने मागण्याची दखल न घेतल्याने आज पंढरीत प्रहार संघटनेच्या वतीने तहसिल कार्यालया समोर मुंडन आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला रयतक्रांती संघटना,बळिराजा संघटना,आम आदमी पार्टी रघुनाथ दादा शेतकरी संघटना, रा. स. प इत्यादि संघटनेने या आंदोलनाला पाठिंबा दिला. संतप्त झालेल्या प्रहार संघटनेचे रणजित जकताप यांनी आषाढीला मुख्यमंत्री आल्यानंतर प्रहार संघटने कडून गाढव भेट देणार असल्याचे सांगीतले.



या आंदोलनास शेतकरी, शेतमजूर, कामगार, दिव्यांग, निराधार, विधवा तसेच मोठ्या संख्येने प्रहार सैनिक उपस्थित होते.

---

# भाळवणीचे सरपंच रणजीत जाधव आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर येथे दैनिक नवममित्र च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त येथील रुक्माई सभागृह येथे मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे, सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख महेश( नाना) साठे, राज्य डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सतीश सावंत, मराठी पत्रकार संघाचे राज्य सह चिटणीस हरिभाऊ प्रक्षाळे, प्राध्यापक नंदकुमार उबाळे, संपादक सचिन माने, कार्यकारी संपादक राजेश शिंदे, उपसंपादक विठ्ठल जाधव, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आदर्श सरपंच म्हणून रणजीत जाधव यांना पुरस्कारासह शाल प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले



---

# धाराशिव येथे पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १२ जून रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे आता जिल्हा परिषद धाराशिव च्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांसाठी आयोजित एकदिवशीय आरोग्य तपासणी शिबीर १२ जुन ऐवजी आत्ता १६ जुन रोजी आयोजित करण्यात आले आहे.

विविध उपक्रम तसेच शासकीय योजना बाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दि.१६ जुन रोजी स्थायी समिती सभागृह जिल्हा परिषद धाराशिव येथे करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे. सकाळी १० वाजता, पत्रकारांची नाव नोंदणी होईल, त्यानंतर १०:३० वाजता प्रास्ताविक सुरू होईल. सकाळी ११ते दुपारी १ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजन करण्यात आले आहे. डॉ.राठोड व डॉ. रवी चव्हाण हे पत्रकारांची आरोग्य तपासणी करतील दुपारी १ ते २ यावेळेत जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखाकडून विवीध शासकिय योजना व उपक्रमाची माहिती देणार आहे.त्यानंतर २ ते २:३० या वेळेत अल्पोहर व समारोप सत्र होईल.

या आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले आहे.

---

# ज्वेलर्सचे दुकान फोडून ५० हजाराचे चांदीचे दागिने पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) भवानी पेठेतील घोंगडे वस्ती येथ ओंकार ज्वेलर्स नावाच्या दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने प्रवेश करत ५० हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना ९ ते १० जून रोजी दरम्यान घडली.याप्रकरणी ओंकार मारुती पंडित (वय-२१,रा.घोंगडे वस्ती,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरू करीत आहेत.

---

**महामार्ग तासभर ठप्प! वाहतूक खोळंबली**

**महायुती सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी**

# ‘क्या हुआ, तेरा वादा?’च्या घोषाने लातूरमध्ये शिवसेनेचा रास्ता रोको

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव

लातूर : शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि सन्मान योजनेतून १५ हजार रुपये, लाडक्या बहिणींना १५०० चे २१०० रुपये, ४५ हजार गावात पाणंद रस्ते, वृध्द पेन्शन धारकांना २१०० रुपये, शेतीला २४ तास वीज आणि बेरोजगारांना २५ लाख नोकऱ्या आणि १० हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांचे काय झाले? असा सवाल करीत सरकारने या सर्व आश्वासनांची तात्काळ पूर्तता करावी, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि.१२) लातूरच्या छत्रपती चौकात रास्ता रोको आंदोलन केले.






नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा व महायुतीने अनेक घोषणा केल्या होत्या. या घोषणांची अंमलबजावणी करावी यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने राज्यभर आंदोलने सुरू आहेत. लातूर येथे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी, बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना हे निवेदनही दिले होते.

त्यानंतर सत्ताधारी स्थानिक आमदारांना या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावरही सरकारने लक्ष न दिल्याने अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने गुरुवारी औसा रोड वरील छत्रपती चौकात रास्ता रोको आंदोलन केले.

जवळपास तासभर चाललेल्या या आंदोलनामुळे रत्नागिरी नागपूर महामार्गावरील वाहतूक तसेच लातूरच्या बायपास वरील वाहतूक ठप्प झाली.

यावेळी शिवसैनिकांनी महायुती सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांना कर्जमाफी तात्काळ द्या, यासह अनेक घोषणा यावेळी देण्यात आल्या.

या आंदोलनात जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी, जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्यासह सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक सौ. सुनिताताई चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, हरिभाऊ सगरे, बाळासाहेब डोंगरे, संतोष सुर्यवंशी, महानगर सुनिल बसपुरे, योगेश स्वामी, तालुकाप्रमुख शिवाजी चव्हाण, कैलास पाटील, अविनाश रेशमे, आबासाहेब पवार, नंदकुमार पवार, परमेश्वर सुर्यवंशी,दत्ता हिंगणे, परमेश्वर पाटील, प्रशांत मोरे, किशोर जाधव, मुकेश सुडे, आण्णासाहेब मिरगाळे, माधव कलमुकले, त्र्यंबक स्वामी, संजय उजळबे, सुरेश भुरे, मुनीरखान पठाण, सलीम पटेल, श्रीराम कुलकर्णी, किसन समुद्रे, शंकर रांजणकर, हनुमंत पडवळ,प्रशांत वांजरवाडे , प्रदीप उपासे, राहुल रोडे, विष्णू शिंदे, सुधाकर जायभाय, पद्माकर पेंढारकर, सचिन मुळे, मंगलबाई कांबळे आदी शिवसैनिक सहभागी झाले होते.